IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पर्यावरण जाणीव - जागृतींचा अभ्यास

**श्रीमती प्रणाली ज्ञानदेव सोनवणे**
संशोधक विदयार्थिनी
कबचौउमवि जळगांव 425001
( शिक्षणशास्त्र विभाग )

**डॉ. मनीषा. व्ही. इंदाणी**
मार्गदर्शक
विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग
कबचौउमवि जळगांव 425001

सारांश :-

प्रस्तुत संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पर्यावरण जाणीव जागृतींचा अभ्यास करण्यासाठी एकूण पंधरा प्रश्न विचारण्यात आले होते आलेल्या एकूण सर्व प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून टक्केवारी काढण्यात आली त्यावरून 69 टक्के विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती आहे तर 31 टक्के विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती नाही असे दिसून आले.

## 1.1 प्रस्तावना :-

प्रस्तुत संशोधनात महाविदयालयीन विद्यार्थ्यां च्या पर्यावरण विषयक जाणीव -जागृतीचा अभ्यास केला . सजीवांच्या दुष्टीने पर्यावरणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे . प्राचीन ग्रंथामध्येही पर्यावरणासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले आहे . योग्य पर्यावरणाशिवाय संजीवांचे जीवन सुकर असूच शकत नाही . सध्याच्या युगात औदयोगिक व तांत्रिक विकासाबरोबरच पर्यावरण बिघडण्यास सुरुवात झाली आहे . गेल्या दोन -तीन दशकांपासून तर पर्यावरणीय समस्यांनी गंभीर रूप धारण केले आहे .

त्यामुळे महाविदयालयीन विद्याथ्र्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव-जागृती करणे फार गरजेचे आहे. विदयाथ्र्यांनी पर्यावरणाची काळजी घेतली पाहीजे. प्लास्टिक, मेटल इ. घनकच·याची विद्याथ्र्यांनी व्यवस्थित विल्हेवाट लावली पाहिजे. पाणी, वीज, इ. गोष्टींचा जपून वापर केला पाहिजे. जागतिक तापमान खूप वाढते आहे. त्यामुळे विद्याथ्र्यांमध्ये वृक्षारोपणांविषयी जाणीव निर्माण झाली पाहीजे. आपल्या कॉलेजचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. आजचे महाविदयालयीन विद्यार्थी हे उद्याचे आपल्या देशाचे भावी नागरिक असणार आहेत. कोणताही विकास साधताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणे मानव व सजीव सृष्टीच्या दृष्टीने अहितकारक आहे. ही जाणीव विद्याथ्र्यांमध्ये रुजावी, म्हणूनच प्रस्तुत संशोधन करण्यात आले.

1.2 संशोधनाची उद्दिष्टे :-

1) महाविद्यालयीन विद्याथ्र्यांच्या कागदाचा योग्य आणि पुर्नवापर संदर्भातील जाणीव जागृतींचा अभ्यास करणे.

2) महाविद्यालयीन विद्याथ्र्यांच्या कच·याच्या पेटीच्या सुयोग्य वापराच्या जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.

3) महाविदयालयीन विद्याथ्र्यांच्या पाण्याच्या सुयोग्य वापराबद्दल जाणीव-जागृतीचा अभ्यास करणे.

4) महाविदयालयीन विद्याथ्र्यांच्या परिसर स्वच्छतेबद्दलच्या जाणीव-जागृतीचा अभ्यास करणे.

5) महाविद्यालयीन विद्याथ्र्यांच्या वीज वापराबद्दलच्या जाणीव जागृतीचा अभ्यास करणे.

**1.3 संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संख्यात्मक संशोधन उपागमातील सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

**1.4 पर्यावरण जाणीव जागृती संशोधनाची साधने** :-

या संशोधनाच्या माहीती संकलनासाठी स्व-निर्मित, प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. यात एकूण.१५ प्रश्न होते. हे प्रश्न 1) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कागदाच्या योग्य आणि पुनर्वापर संदर्भातील जाणीव जागृतींचा अभ्यास २ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कचरापेटीच्या सुयोग्य वापराच्या जाणीव जागृतीचा अभ्यास ३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे पाण्याच्या सुयोग्य वापराबद्दल जाणीव जागृतींचा अभ्यास ४) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परिसर

स्वच्छतेबद्दल जाणीव जागृतींचा अभ्यास ५) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वीज वापराबद्दलच्या जाणीव जागृतीचा अभ्यास या घटकावर आधारीत होते.

## 1.5 नमुना :-

प्रस्तुत संशोधनासाठी आकस्मिक नमुना निवडीचा वापर करण्यात आलेला होता. सदर संशोधनासाठी एकूण ६० विध्यार्थी घेतले होते. या नमुन्यातील विद्यार्थी हे शिक्षणशास्त्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे होते.

पर्यावरण संवर्धन जाणीव जागृती अभियान कार्यशाळेसाठी हे विद्यार्थी उपस्थित होते.

## 1.6 माहितीचे विश्लेषण :-

तक्ता क्रं 1: **विद्याथ्र्यांच्या पर्यावरण जाणीव जागृतीच्या प्रश्नावलीला दिलेल्या प्रतिसादांची टक्केवारी दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र | तपशील | विद्यार्थी □□□□□□□ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | कागदाचा योग्य आणि पुर्नवापर करणा·याची संख्या | 29 | 64% |
| 2) | कचरा पेटीचा सुयोग्य वापर करणा·यांची संख्या | 25 | 57% |
| 3) | पाण्याचा सुयोग्य उपयोग करणा·याची संख्या | 33 | 74% |
| 4) | परिसर स्वच्छ करणा·या विद्याथ्र्यांची सरासरी संख्या | 33 | 73% |
| 5) | विजेचा वापर योग्यरित्या करणा·या विद्याथ्र्यांची संख्या | 33 | 73% |

1.6 निष्कर्ष :-

1) महाविदयालयीन विद्याथ्र्याच्या कागदाचा अभ्यास करण्यासाठी प्रश्न क्रमांक 1, 2, 3, 4 आणि 5 यांना विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादांची टक्केवारी काढण्यात आली. यावरून तक्ता क्र. 1 मध्ये दिल्याप्रमाणे 64% महाविद्यालयीन विद्यार्थी कागदाचा योग्य आणि पुर्नवापर करतात. 36% महाविदयालयीन विद्यार्थी कागदाचा योग्य वापर करत नाही.

2) महाविदयालयीन विद्याथ्र्यांचे कचरा पेटीच्या सुयोग्य वापराच्या जाणीव जागृतीचा अभ्यास या उदिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रश्न क्रं 6, 7, 8 आणि 11 यांना विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादांची टक्केवारी काढण्यात आली, ती तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार 57% विद्यार्थी कचरा पेटीचा सुयोग्य वापर करतात. 43% महाविदयालयीन विद्यार्थी सुयोग्य वापर करत नाही.

3) महाविदयालयीन विद्याथ्र्यांच्या पाण्याचा सुयोग्य वापराच्या जाणीव जागृतीचा अभ्यास या उदिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रश्न क्रं 9 ला विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून टक्केवारी काढण्यात आली, ती तक्ता क्र. 1 मध्ये दर्शविण्यात आली. त्यानुसार 74% महाविद्यालयीन विद्यार्थी पाण्याचा सुयोग्य वापर करतात. 26% महाविदयालयीन विद्यार्थी पाण्याचा सुयोग्य वापर करत नाही.

4) महाविदयालयीन विद्याथ्र्यांच्या परिसर स्वच्छतेबाबत जाणीव जागृती अभ्यास या उदिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रश्न क्र. 10 व 15 यांना विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादाची टक्केवारी काढण्यात आली. ती तक्ता क्र. 4 मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार 73% विद्याथ्र्यांमध्ये परिसर स्वच्छतेबाबत जाणीव-जागृती आहे. तर 27% विद्याथ्र्यांमध्ये जाणीव जागृती नाही.

5) महाविदयालयीन विद्याथ्र्यांच्या वीज वापराबाबत जाणीव जागृतीचा अभ्यास या उदिष्टाच्या पूर्ततेसाठी प्र. क्रं 11, 12, 13 व 14 यांना विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादाची टक्केवारी काढण्यात आली. ती तक्ता क्र. 5 मध्ये दाखविण्यात आली आहे. त्यानुसार, 73% महाविद्यालयीन विद्याथ्र्यांमध्ये वीज वापराबाबत जाणीव जागृती आहे. तर 27% विद्याथ्र्यांमध्ये वीज वापराबाबत जाणीव जागृती नाही.

सदर संशोधनात उदिदष्टांच्या पूर्ततेसाठी विचारण्यात आलेल्या एकूण सर्व प्रश्नांना विद्याथ्र्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून एकूण टक्केवारी काढण्यात आली.

**त्यावरून 69% विद्याथ्र्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव - जागृती चांगली आहे, तर 31% विद्याथ्र्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती नाही.**

1.7 चर्चा :-

प्रस्तुत संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पर्यावरण जाणीव जागृतीचा अभ्यास करण्यात आलेला होता. आजचा युवक हा उद्याचा जागरूक नागरिक असणार आहे. या विद्यार्थ्यांमध्ये शंभर टक्के पर्यावरण जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी पालकांनी लक्ष दिले पाहिजे. पर्यावरणाचा ऱ्हास आपण सर्वच ठिकाणी बघत आहोत, पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यामुळेच मानवाचे आरोग्य धोक्यात आलेले आहे अनेक आजार रोगराई पसरत आहे. जे आजार म्हातारपणी येत होते, ते तरुणांमध्ये दिसत आहेत; म्हणून मानवांचे आरोग्य, प्रकृतीचेआरोग्य, निरोगी ठेवण्यासाठी पर्यावरण जाणीव जागृती केलीच पाहिजे.

संदर्भ :-

1) भांडारकर के. म. पर्यावरण शिक्षण, पुणे : नूतन प्रकाशन

2) प्रसाद, शुभदेव (1998) पर्यावरण शिक्षा क्यो और कैसे, दिल्ली : प्रभात प्रकाशन,

3) पर्यावरण शिक्षण आचरण कार्यपुस्तिका. (1999), मुंबई : जीवनदीप प्रकाशन.

4) पंखा, शुभू. (9550) पर्यावरण की संस्कृती. बिकानेर : वाग्देवी प्रकाशन

5) चौरासिया, आणि आसरे, राम (1992), पर्यावरण, प्रदूषण एवं प्रबंधन, इलाहाबाद : वोहरा पब्लिशर्स एन्ड डिस्ट्रीब्युटर्स,

6) गोयल एम. के. (1997) पर्यावरण शिक्षा, आग्रा: विनोद पुस्तक मंदीर

7) संख्यात्मक व गुणात्मक संशोधन, प्रशांत पब्लिकेशन्स प्रा. डॉ. मनीषा इंदाणी.

8) शौक्षणिक संशोधन प्रस्ताव लेखन, अथर्व पब्लिकेशन्स, प्रा. डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. इंदूमती भारंबे, प्रा. डॉ. प्रा. डॉ. मनीषा जगताप.